# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**// उपमहापौर निवड विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //**(ऑनलाईन ॲपव्दारे)

**सभा क्र.:- २३** **दि.११/११/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.११/११/२०२० बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.श्री.अभिजीत राऊत, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांचे अध्यक्षतेखाली ऑनलाईन ॲपव्दारे झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

ऑनलाईन ॲपव्दारे खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.अभिजीत राऊत, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी जळगांव**.

| | | |
|---|---|---|
| सोनवणे भारती कैलास मा.महापौर | कापसे प्रतिभा चंद्रकांत | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| जोहरे प्रिया मधुकर | पाटील विजय पुंडलिक | सोनार रंजना विजय |
| नेरकर सरिता अनंत | सोनवणे सुरेश माणिक | खडके सुनिल वामनराव |
| पोकळे दिलीप बबनराव | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील कुलभुषण विरभान | भंगाळे विष्णु रामदास |
| बाविस्कर किशोर रमेश | भिल पार्वताबाई दामु | लढढा नितीन बालमुकुंद |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे ललीत विजय | बरडे नितीन मनोहर |
| कोल्हे प्रविण रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सनकत चेतन गणेश | राणे गायत्री इंद्रजित | महाजन सुनिल सुपडू |
| चौधरी चेतना किशोर | तायडे सुरेखा नितीन | महाजन जयश्री सुनिल |
| सोनवणे मुकुंदा भागवत | चव्हाण ज्योती बाळासाहेब | शेख शबानाबी सादीक |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | नाईक प्रशांत सुरेश |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| काळे दिपमाला मनोज | सोनवणे सुरेखा सुदाम | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे अश्विन शांताराम | ढेकळे सदाशिव गणपत | **स्विकृत सदस्य** |
| पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु | सोनवणे कैलास नारायण |
| भोईटे लताबाई रणजीत | बालाणी भगतराम रावलमल | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील प्रतिभा सुधीर | अत्तरदे रजनी प्रकाश | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | काळे रेश्मा कुंदन | चौधरी महेश रतन |
| कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतीश कुलकर्णी, मा.उपआयुक्त, श्री.किरण देशमुख, मुख्य लेखाधिकारी, श्री.कपिल पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**मा.पिठासीन अधिकारी :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाच्या निवडीसाठी आयोजित आजच्या ऑनलाईन ॲपव्दारे विशेष महासभेस उपस्थित असलेल्या सर्व सदस्याचे मी

स्वागत करीत असून उपमहापौर निवडी संबंधातील सभेचे पुढील कामकाज नगरसचिव यांनी सुरु करावे.

**नगरसचिव :-** नमस्कार, सभेस उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. आजची ऑनलाईन ॲपव्दारे विशेष महासभा मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्र. नपप्र/२०२०/निवड/कार्या/२/कावि /४१११२० दि.०४/११/२०२० अन्वये उपमहापौर पदाचे निवडीसाठी आयोजित करणेंत आली असुन या ऑनलाईन (ॲपव्दारे) विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणुन मा.श्री.अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, जळगांव यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर सभेसाठी ते विराजमान आहेत.

जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकी नंतरच्या पहिल्या सत्रासाठी श्री.सोनवणे अश्विन शांताराम यांची दि.१८/०९/२०१९ रोजी उपमहापौर म्हणुन निवड करण्यात आलेली होती. श्री.सोनवणे अश्विन शांताराम यांनी दि.२९/१०/२०२० रोजी उपमहापौर पदाचा राजीनामा दिलेमुळे उर्वरीत कालावधीकरिता उपमहापौर निवडी संबंधात विशेष सभा आयोजीत करणेसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कडेस पत्र जा.क्र./नसका/१०७०/२०२०-२०२१ दि.०२/११/२०२० अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्र. नपप्र/२०२०/निवड/कार्या/२/कावि /४१११२० दि.०४/११/२०२० चे प्राप्त झालेवर पहिल्या सत्रातील उर्वरीत कालावधीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९(५) अन्वये उपमहापौर पदाची निवड करण्याकरीता तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने निवडणुक कार्यक्रम दि.०४/११/२०२० रोजी घोषित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे विषय सुची सर्व सन्मा. सदस्यांना बजावण्यात आलेली आहे. घोषित निवडणूक कार्यक्रमानुसार दि.०५/११/२०२० गुरुवार पासून ते दि.०९/११/२०२० सोमवार या कालावधीत (सुटीचे दिवस वगळुन) सकाळी ११ ते दुपारी ०१.०० वाजेपावेतो कोरे नामनिर्देशन पत्र वितरीत करणे तसेच दि.१०/११/२०२० मंगळवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ०२.०० वाजेपावेतो नामनिर्देशन पत्र दाखल करणेबाबत मुदत देण्यात आलेली होती. सदर मुदतीत उपमहापौर पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले आहेत.

**उपमहापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशनपत्राचा तपशील**

| अ.क्र. | नामनिर्देशन दाखल दिनांक | उमेदवाराचे पूर्ण नांव | प्रभाग क्र | उमेदवाराचा संपूर्ण पत्ता | सूचकाचे पूर्ण नांव | अनुमोदकाचे पूर्ण नांव | दाखल वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०/११/२०२० | खडके सुनिल वामनराव | १७ क | २४८, विठ्ठल पेठ, जळगांव | काळे रेश्मा कुंदन | मराठे जितेंद्र भगवान | सकाळी ११.५८ वाजता |
| २ | १०/११/२०२० | खडके सुनिल वामनराव | १७ क | २४८, विठ्ठल पेठ, जळगांव | बालाणी भगतराम रावलमल | पाटील राजेंद्र झिपरु | सकाळी ११.५८ वाजता |

**नगरसचिव :-** उपमहापौर पदासाठी ०२ (दोन) दाखल झालेली नामनिर्देशन पत्रे छाननीसाठी मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडेस सादर करण्यांत येत आहेत.

**मा.पिठासीन अधिकारी :-** उपमहापौर पदासाठी **श्री. खडके सुनिल वामनराव** यांची दोन नामनिर्देशनपत्रे प्राप्त झालेली असून **पहिल्या नामनिर्देशनपत्रावर** सौ. काळे रेश्मा कुंदन हे **सूचक**

तर श्री. मराठे जितेंद्र भगवान हे **अनुमोदक** आहेत **दुसऱ्या नामनिर्देशनपत्रावर** श्री.बालाणी भगतराम रावलमल हे **सूचक** तर श्री.पाटील राजेंद्र झिपरु हे **अनुमोदक** आहेत.

नगरसचिव यांचेकडून प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्रांची नियमांचे तरतूदीनूसार छाननी करण्यात आलेली असून ते नियमानूसार असल्याने सर्व नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषीत करण्यात येत आहे. उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास नियम ६(३) नुसार त्यांना १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येत आहे. यावेळेस घडयाळात **सकाळी** ११.११ वाजलेले आहेत. येथून १५ मिनिटांचा कालावधी मोजण्यात येईल. त्यानुसार **सकाळी** ११.२६ वाजेपावेतो उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ शकतील. (यानंतर १५ मिनिटांची वेळ देण्यात आली.)

**मा.पिठासीन अधिकारी :-** उपमहापौर पदासाठी एक मात्र उमेदवाराने नामनिर्देशन दाखल केलेले असुन माघारीसाठी देण्यात आलेल्या मुदतीत त्यांनी आपली उमेदवारी कायम ठेवलेली आहे. त्यामुळे जळगांव शहर महानगरपालिकेच्या पहिल्या सत्रातील उर्वरित कालावधीसाठी **श्री. खडके सुनिल वामनराव** हे उपमहापौर म्हणुन बिनविरोध निवडुन आलेचे मी घोषीत करीत आहे.

निवड झालेल्या नवनिर्वाचित उपमहापौर **श्री. खडके सुनिल वामनराव** यांचे मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांनी अभिनंदन व स्वागत केले त्यानंतर सभा कामकाजाची सांगता केली.

राष्ट्रगीत नंतर येणे प्रमाणे उपमहापौर निवडीची सभा शांततेत पार पडली.

**सही/-**
**(अभिजीत राऊत)**
**पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**
**उपमहापौर निवडणूक नोव्हेंबर २०२०**